RNI No. MAHBIL /2009/35527

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-क

वर्ष १२, अंक ४० (२)] सोमवार, सप्टेंबर २१, २०२६/भाद्रपद ३०, शके १९४८ [पृष्ठे ३६ , किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ६३

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले

(भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर)

वैधानिक नियम व आदेश; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (राज्य ग्रिड संहिता) (पहिली सुधारणा) विनियम, २०२६

अधिसूचना

विद्युत अधिनियम, २००३.

क्रमांक मविनिआ/तांत्रिक/विनियम/२०२६/०७८३.— विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६) च्या कलम ८६ (१)(एच) सह कलम १८१ च्या उप कलम (२)च्या खंड (झेडपी) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मविनिआ) याद्वारे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (राज्य ग्रिड संहिता) विनियम, २०२० (" मुख्य विनियम ") मध्ये सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे विनियम करीत आहे :-

१. संक्षिप्त शीर्षक, व्याप्ती आणि प्रारंभ

१.१ या विनियमांना महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (राज्य ग्रिड संहिता) (पहिली सुधारणा) विनियम, २०२६ असे म्हणावे.

१.२ हे विनियम सबंध महाराष्ट्र राज्यास लागू राहतील.

१.३ हे विनियम **शासकीय राजपत्रातील** त्यांच्या प्रसिध्दीच्या दिनांकापासून अंमलात येतील आणि त्यामध्ये आयोगाकडून सुधारणा, बदल, फेरफार किंवा फेरबदल करण्यात येत नाहीत तोपर्यंत अंमलात राहतील :

परंतु असे की, डे अहेड काल व परिमाण निर्धारणाशी (शेड्युलिंग) संबंधित तरतुदी, एसएलडीसीने शेड्युलिंग सॉफ्टवेअर अद्ययावत केल्यानंतर अंमलात येतील आणि हा दिनांक या विनियमांच्या अधिसूचनेपासून तीन महिन्यांच्या नंतरचा नसेल :

परंतु आणखी असे की, विनियम ५३.२.१, ५३.२.२, ५३.२.३, ५३.३.५, ५३.३.९, ५३.४.३, ५३.४.६, ५३.५.१ आणि ५३.५.२ खालील गेट क्लोजर आणि इण्ट्रा-डे सुधारणांच्या निर्धारणाशी संबंधित सुधारित तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी एसएलडीसीच्या पूर्वतयारीची आवश्यकता असेल, ज्याबाबत एसएलडीसी आयोगाला या विनियमांच्या अधिसूचनेपासून एक वर्षाच्या आत स्वतंत्रपणे कळविल. तोपर्यंत मुख्य विनियम ५३.२.१, ५३.२.२, ५३.२.३, ५३.३.५, ५३.३.९, ५३.४.३, ५३.४.६, ५३.५.१ आणि ५३.५.२ मधील इण्ट्रा-डे सुधारणांच्या निर्धारणाशी संबंधित तरतुदी अंमलात राहतील.

२. मुख्य विनियमांच्या विनियम २ मध्ये सुधारणा :

मुख्य विनियमांच्या विनियम २.१ (४) नंतर विनियम २.१ (४)(ए) आणि विनियम २.१ (४)(बी) ची भर घालण्यात येते.

४(ए) " **आनुषंगिक सेवा** " विद्युत यंत्रणा प्रचालनाच्या संबंधात आनुषंगिक सेवा म्हणजे ग्रिडची विद्युत गुणवत्ता, विश्वासार्हता आणि सुरक्षा कायम ठेवण्यात ग्रिड प्रचालनाच्या सहाय्यासाठी आवश्यक असणाऱ्या सेवा अभिप्रेत आहेत आणि यामध्ये प्राथमिक राखीव आनुषंगिक सेवा, द्वितीयक राखीव आनुषंगिक सेवा, तृतीयक राखीव आनुषंगिक सेवा, विद्युत भार अनुगामी साठी ॲक्टिव्ह पॉवर आधार, रिॲक्टिव्ह पॉवर आधार, ब्लॅक स्टार्ट आणि या विनियमांमध्ये व्याख्या केलेल्या अशा अन्य सेवांचा समावेश आहे.

४(बी) " **क्षेत्र नियंत्रण त्रुटी** " किंवा " **एसीइ** " केंद्रीय आयोगाने अधिसूचित केलेल्या भारतीय विद्युत ग्रिड संहिता विनियमांच्या विनियम ३० च्या खंड (११) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे राहील.

मुख्य विनियमांच्या विनियम २.१ (४६) नंतर विनियम २.१ (४६)(ए) ते २.१ (४६) (सी) ची भर घालण्यात येते.

४६(ए) " **गेट क्लोजर** " म्हणजे पॉवर एक्स्चेंजमध्ये विशिष्ट डिलिव्हरी कालावधीसाठी बोली समाप्त होते ती वेळ आणि सदर डिलिव्हरी कालावधीसाठी आणखी कोणतीही बोली किंवा आधीच लावलेल्या बोलीमध्ये सुधारणा केली जाऊ शकत नाहीत.

४६(बी) " **जीएनए विनियम** " म्हणजे वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेले, केंद्रीय विद्युत नियामक आयोग (आंतर-राज्य पारेषण यंत्रणेशी संयोजकता आणि सामान्य नेटवर्क प्रवेश) विनियम, २०२२ होय.

४६(सी) " **जीएनए मंजुरी प्राप्तकर्ता** " म्हणजे अशी व्यक्ती ज्याला जीएनए विनियमांच्या अंतर्गत जीएनए मंजुरी देण्यात आलेले आहे किंवा मंजुरी देण्यात आलेली आहे असे मानण्यात आलेले आहे.

मुख्य विनियमांच्या विनियम २.१ (६८) नंतर विनियम २.१ (६८)(ए) ची भर घालण्यात येते.

६८(ए) " **किमान टर्नडाऊन पातळी** " म्हणजे कमाल अखंडीत विद्युत रेटिंगच्या सरासरीमध्ये व्यक्त केलेली किमान आऊटपुट विद्युत होय, ज्यास निर्मिती संच बारवर टिकून राहण्यासाठी अखंडीतपणे कायम ठेवतो; आणि यामध्ये सीइए (कोळशावर आधारित औष्णिक विद्युत निर्मिती संचाचे लवचिक प्रचालन) विनियम २०२३ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे किमान विद्युत पातळीचा समावेश असतो.

मुख्य विनियमांच्या विनियम २.१ (८३) नंत र विनियम २.१ (८३)(ए) आणि २.१ (८३) (बी) ची भर घालण्यात येते.

८३ (ए) " **सुरक्षा मर्यादे अंतर्गत मितव्ययी प्रेषण** " **किंवा** " **एससीईडी** " म्हणजे वेळोवेळी सुधारणा केलेल्या आयइजीसी विनियमांमध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार निर्मिती आणि पारेषण सुविधांच्या प्रचालन आणि तांत्रिक मर्यादेच्या अधीन राहून निर्मिती संचाचे इष्टतम प्रेषण होय.

८३ (बी) **"सुरक्षा मर्यादे अंतर्गत युनिट प्रतिबध्दता" किंवा "एससीयुसी"** म्हणजे आयइजीसी विनियमांमध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार पारेषण यंत्रणेच्या मर्यादा आणि संचाच्या प्रचालनाची वैशिष्ट्ये विचारात घेऊन वीज निर्मिती संचाने केलेली प्रतिबध्दता होय.

३. मुख्य विनियमांच्या विनियम ३४ मध्ये सुधारणा :-

३४. राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडलेल्या राज्यांतर्गत निर्मिती केंद्राच्या संचलनासाठी किमान तांत्रिक निर्धारण

३४.१ राज्यांतर्गत औष्णिक निर्मिती केंद्राच्या संचाच्या संबंधात संचलनासाठीची किमान टर्नडाऊन पातळी (किमान तांत्रिक) सदर संचाच्या निर्मिती क्षमतेच्या कमाल प्रमाणाच्या (एमसीआर) ५५ टक्के किंवा वेळोवेळी सुधारणा केलेल्या सीइए (कोळशावर आधारित औष्णिक विद्युत निर्मिती संचाचे लवचिक कार्यान्वयन) विनियम २०२३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अशा अन्य किमान विद्युत पातळी, यापैकी जे कमी असेल त्याप्रमाणे राहील.

परंतु असे की, अशा निर्मिती केंद्राला या खंडामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या किमान टर्नडाऊन पातळीपेक्षा कमी किमान टर्नडाऊन पातळी स्वत:हून घोषित करता येईल.

परंतु आणखी असे की, वरील तरतुदीपासून घेतलेली फारकत आयोगाकडून प्रकरण-निहाय तत्त्वावर, पुष्ट्यर्थ दस्तावेजासह निर्मिती संचाच्या ओरीजनल इक्विपमेंट मॅन्युफॅक्चररने (ओईएम) प्रमाणित करण्याच्या अधीन राहून, विचारात घेण्यात येईल.

३४.२ ग्रिडच्या सुरक्षिततेसाठी किंवा खरेदीदारांनी दिलेल्या कमी निर्धारणामुळे राज्यांतर्गत निर्मिती केंद्रांना त्यांचे संच किमान तांत्रिक निर्धारणावर किंवा त्यापेक्षा जास्त निर्धारणावर परंतु प्रमाणकानुसार संयंत्र उपलब्धता घटकापेक्षा कमी पातळीवर चालविण्याबाबत एसएलडीसीला निर्देश देता येतील.

परंतु असे की, बहुविध खरेदीदारांना विजेचा पुरवठा करणाऱ्या निर्मात्यांसाठी भरपाईची (कॉम्पनसेशन) परिगणना हे विनियम आणि त्यांच्या जोडपत्र - ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कार्यपध्दतीनुसार करण्यात येईल आणि परिगणना केलेल्या एकूण आकारांची वाटणी निर्मात्याच्या खरेदीदारांमध्ये त्या कालावधीसाठी अंमलबजावणी केलेल्या त्यांच्या निर्धारणाच्या प्रमाणात करण्यात येईल.

परंतु आणखी असे की, एसएलडीसीच्या सूचनांनुसार, निर्माते ८५ टक्क्यांपेक्षा कमी संचाच्या कामगिरीसाठी खरेदीदारांकडे सादर केलेल्या दाव्यांसाठी स्वतंत्र खाते ठेवेल. अशी माहिती आणि तपशील इंधन समायोजन आकारांचा दावा मान्यतेसाठी सादर करताना आणि वीज दराच्या प्रक्रियेसाठी याचिका दाखल करताना आयोगाकडे सादर करण्यात येईल.

३४.३ ज्या राज्यांतर्गत निर्मिती केंद्रांचा वीज दर आयोगाकडून अधिनियमाच्या कलम ६३ अंतर्गत स्वीकृत करण्यात येतो त्यांना एसएलडीसीकडून किमान तांत्रिक निर्धारणावर किंवा त्यापेक्षा जास्त निर्धारणावर परंतु प्रमाणकानुसार संयंत्र उपलब्धता घटकापेक्षा कमी पातळीवर चालविण्याबाबत निर्देश देण्यात येतील. अशा राज्यांतर्गत निर्मिती

केंद्रांना सक्तीचे आउटेज, नियोजित आउटेज, संयत्र भार घटक, जनरेटर टर्मिनलच्या ठिकाणची निर्मिती, एक्स-बस द्वारे पाठविलेली ऊर्जा, प्रारंभ-बंदची संख्या, दुय्यम इंधन तेलाचा वापर आणि सहाय्यकारी ऊर्जेचा वापर या बाबी उचितपणे विचारात घेऊन, संचाच्या सरासरी भाराच्या आधारे (एयुएल), केंद्रातील उष्मांक प्रमाणाचे प्रत्यक्ष आणि प्रमाणकानुसार संचलन मापदंड, सहाय्यकारी उर्जा वापर आणि दुय्यम इंधन तेलाचा वापर इ. बाबींचा उचित विचार करुन, महिना-निहाय तत्त्वावर भरपाई देता येईल.

परंतु असे की, एसएलडीसी संबंधित जनरेटर्सचे सक्तीचे आउटेज आणि नियोजित आउटेज, प्रारंभ-बंद प्रचालनाची संख्या यांची माहिती प्रमाणित करेल.

परंतु आणखी असे की, जर परिगणनेसाठीच्या कालावधीसाठी निर्मिती केंद्राचा एयुएल ८५ टक्क्यांच्या सममूल्य किंवा त्यापेक्षा जास्त असेल तर, केंद्रातील उष्मांक दरातील (एसएचआर) वाढीसाठी अथवा सहाय्यकारी उर्जा वापरामधील (एइसी) वाढीसाठी कोणतीही भरपाई देण्यात येणार नाही.

परंतु असेही की:

ए) कोळसा/लिग्नाईटवर आधारित निर्मिती केंद्रांसाठी, खालीलप्रमाणे केंद्रातील उष्मांक प्रमाणातील वाढ किंवा प्रत्यक्ष उष्मांक दर, यापैकी जे कमी असेल ते, भरपाईच्या प्रयोजनासाठी विचारात घेण्यात येईल:

अनु क्र.	संचाच्या स्थापित क्षमतेच्या टक्केवारीत संचाचा भार (%)	केंद्रातील उष्मांक दरातील वाढ (उप-गुंतागुंतीच्या संचांसाठी) (%)	केंद्रातील उष्मांक दरातील वाढ (विशेष गुंतागुंतीच्या संचांसाठी) (%)
१	८५ - १००	निरंक	निरंक
२	७५ - ८४.९९	२.२५	१.२५
३	६५ - ७४.९९	४	२
४	५५ - ६४.९९	६	३

बी) कोळसा/लिग्नाईटवर आधारित निर्मिती केंद्रांकरिता, भरपाईच्या प्रयोजनासाठी खालीलप्रमाणे सहाय्यकारी ऊर्जा वापरातील वाढ किंवा प्रत्यक्ष वापर, यापैकी जे कमी असेल ते, विचारात घेण्यात येईल :

अनु. क्र.	संचाचा भार (एमसीआरच्या %)	एइसीमधील अनुज्ञेय वाढ (%)
१.	८५ - १००	निरंक
२.	७५ - ८४.९९	०.३५
३.	६५ - ७४.९९	०.६५
४.	५५ - ६४.९९	१.००

सी) जर निर्धारित निर्मिती किमान तांत्रिक निर्धारणापेक्षा कमी झाली तर, संबंधित राज्यांतर्गत निर्मिती केंद्राकडे संविदात्मक बंधनांची पूर्तता करण्याच्या अधीन राहून संच बंद (शट डाऊन) करण्याचा पर्याय असेल. अशा प्रकरणी, एक वर्षातील सात

(७) प्रारंभ/बंदच्या व्यतिरिक्तचा प्रारंभ/बंदचा इंधन खर्च खालील निकष आणि प्रत्यक्ष वापराच्या आधारावर, जे कमी असेल ते, अतिरिक्त भरपाई म्हणून विचारात घेण्यात येईल:

संचाचे आकारमान (मेगावॅट)	प्रत्येक प्रारंभासाठी तेलाचा वापर (Kl)		
	उष्ण	गरम	थंड
२००/२१०/२५० मेगावॅट	२०	३०	५०
५०० मेगावॅट	३०	५०	९०
६६० मेगावॅट	४०	६०	११०

डी) वायुवर आधारित राज्यांतर्गत निर्मिती केंद्रांच्या बाबतीत, उत्पादकाने दिलेल्या वैशिष्ट्यूपर्ण कर्व्हच्या आधारावर आणि केंद्रातील उष्मांक प्रमाण, सहाय्यकारी ऊर्जा वापर (एइसी) इ. च्या प्रत्यक्ष प्रचालन मापदंडांच्या काळजीपूर्वक छाननीनंतर, भरपाई निश्चित करण्यात येईल.

इ) केंद्रातील उष्मांक प्रमाण आणि सहाय्यकारी ऊर्जा वापरासाठीची भरपाई ऊर्जा आकारांच्या संदर्भात काढण्यात येईल.

एफ) प्रमाणकानुसार संयत्र उपलब्धता घटकापेक्षा कमी किमान तांत्रिक निर्धारणापर्यंत संयंत्र कार्यान्वित करण्यास कारणीभूत असणाऱ्या करारबध्द खरेदीदाराला आयोगाने या विनियमांच्या जोडपत्र - ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या भरपाईच्या कार्यपध्दतीच्या आधारे परिगणना केलेली भरपाई सहन करावी लागेल.

जी) निर्मिती केंद्र किंवा संचाला लागू असलेल्या प्रमाणकानुसार केंद्रातील उष्मांक प्रमाण आणि/किंवा प्रमाणकानुसार सहाय्यकारी ऊर्जा वापरापेक्षा (एईसी) प्रत्यक्ष उष्मांक प्रमाण आणि/किंवा प्रत्यक्ष सहाय्यकारी ऊर्जा वापर (एईसी) कमी असेल तर उष्मांक प्रमाणातील वाढ आणि सहाय्यकारी ऊर्जा वापरासाठी (एईसी) भरपाई अनुज्ञेय राहणार नाही.

एच) केंद्रातील उष्मांक प्रमाण (एसएचआर), सहाय्यकारी ऊर्जा वापर (एईसी) आणि दुय्यम तेल वापराचे प्रत्यक्ष भारांकित सरासरीचे प्रचालनात्मक मापदंड उचितपणे विचारात घेऊन आर्थिक वर्षाच्या अखेरीस भरपाईचा ताळमेळ घालण्यात येईल.

आय) निर्मिती केंद्र किंवा संचाला लागू असलेल्या प्रमाणकानुसार केंद्रातील उष्मांक दर आणि/किंवा प्रमाणकानुसार सहाय्यकारी ऊर्जा वापरापेक्षा (एईसी) प्रत्यक्ष उष्मांक दर आणि/किंवा प्रत्यक्ष सहाय्यकारी ऊर्जा वापर (एईसी) कमी असेल, तर उष्मांक प्रमाणातील वाढ आणि सहाय्यकारी ऊर्जा वापरासाठी (एईसी), त्या महिन्यात किंवा वर्षाच्या अखेरीस वार्षिक ताळमेळ घालण्यात आल्यानंतर, भरपाई अनुज्ञेय राहणार नाही.

३४.४ ज्या निर्मिती केंद्रांचा वीज दर आयोगाकडून निश्चित केला जात नाही किंवा स्वीकृत करण्यात येत नाही अशा निर्मिती केंद्रांच्या बाबतीत, संबंधित निर्मिती कंपनीला तांत्रिक किमान

निर्धारणावर संचलन करताना होणाऱ्या नुकसानीच्या भरपाईच्या दाव्याकरिता वीज विक्रीसाठी करण्यात येणाऱ्या वीज खरेदी करारामध्ये वरील तरतुदी कराव्या लागतील.

३४.५ संयत्र अंशत: भाराने कार्यरत ठेवल्यामुळे संयत्रामधून होणाऱ्या उर्त्सजनाच्या पातळीची नोंद निर्मिती कंपनी ठेवील आणि प्रत्येक वर्षासाठीचा अहवाल आयोगास ३१ मे पर्यंत सादर करेल.

३४.६ कमी युनिट लोडींगवर कार्यान्वित असलेल्या संचातील केंद्रातील उष्मांक दर (एसएचआर) आणि सहाय्यक ऊर्जा वापरासाठी (एइसी) ऊर्जा आकारांच्या रुपात मासिक तत्त्वावर भरपाईची कार्यपध्दती आणि सात प्रारंभा नंतरच्या अतिरिक्त प्रारंभासाठी ०.५ मिली प्रति युनिटच्या निकषांपेक्षा जास्त दुय्यम इंधन तेल वापरासाठीच्या भरपाईची कार्यपध्दती या विनियमांच्या जोडपत्र -४ मध्ये देण्यात आली आहे.

अधिनियमाच्या कलम ६२ अंतर्गत आयोगाकडून ज्या औष्णिक निर्मिती केंद्रांचा वीज दर निश्चित करण्यात येतो त्यांना विनियम ३४.८ लागू राहील.

३४.८ अधिनियमाच्या कलम ६२ अंतर्गत आयोगाकडून ज्या औष्णिक निर्मिती केंद्रांचा वीज दर निश्चित करण्यात येतो त्यांना मविनिआ (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०२४ च्या विनियम ४७ अंतर्गत विनिर्दिष्ट केलेल्या प्रमाणकानुसार संयत्र उपलब्धता घटकापेक्षा कमी लोडींगमुळे झालेल्या केंद्रातील उष्मांक प्रमाणातील आणि सहाय्यकारी ऊर्जा वापरातील वाढीसाठी, अतिरिक्त दुय्यम इंधन तेलाच्या वापरासाठी भरपाई देण्यात येईल.

३४.८.१ अशा रीतीने परिगणना केलेली भरपाई, ज्या करारबध्द खरेदीदारामुळे संयत्र ठरवून दिलेल्या प्रमाणकानुसार उपलब्धता संयत्र घटकापेक्षा कमी ते थेट तांत्रिक किमान पातळीपर्यंत कमी निर्धारणावर चालू ठेवावे लागले, त्या करारबध्द विक्रेत्याला सहन करावी लागेल.

३४.८.२ केंद्रातील उष्मांक प्रमाण आणि सहाय्यकारी ऊर्जा वापरासाठीची भरपाई ऊर्जा आकाराच्या दराच्या संदर्भात काढण्यात येईल.

३४.८.३ या विनियमांतर्गत भरपाईच्या प्रयोजनासाठी, वेळोवेळी सुधारणा केलेल्या मविनिआ बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०२४ च्या विनियम ४७ अंतर्गत विनिर्दिष्ट केलेल्या निकषांव्यतिरिक्त केंद्रातील एकूण उष्मांक प्रमाणातील (एसएचआर) वाढ खालीलप्रमाणे विचारात घेण्यात येईल:-

ए) कोळसा किंवा लिग्नाईटवर आधारीत निर्मिती केंद्रांसाठी:-

अनु. क्र.	संचाच्या स्थापित क्षमतेच्या टक्केवारीत संचाचा भार	केंद्रातील उष्मांक प्रमाणातील वाढ (उप-गुंतागुंतीच्या संचांसाठी) (%)	केंद्रातील उष्मांक दरातील वाढ (विशेष गुंतागुंतीच्या संचांसाठी) (%)
१.	८५ -१००	निरंक	निरंक
२.	८० - <८५	२.१	१.८
३.	७५ - <८०	३.०	२.५
४.	७० - <७५	४.०	३.३

अनु. क्र.	संचाच्या स्थापित क्षमतेच्या टक्केवारीत संचाचा भार	केंद्रातील उष्मांक प्रमाणातील वाढ (उप-गुंतागुंतीच्या संचांसाठी) (%)	केंद्रातील उष्मांक दरातील वाढ (विशेष गुंतागुंतीच्या संचांसाठी) (%)
५.	६५ - <७०	५.१	४.१
६.	६० - <६५	६.१	४.९
७.	५५ - <६०	७.६	६.०
८.	५० - <५५	९.२	७.१
९.	४५ - <५०	११.३	८.३
१०.	४० - <४५	१३.८	९.९

बी) वायु किंवा द्रव इंधनावर आधारीत निर्मिती केंद्रांसाठी :-

एक) सीसीजीटी पध्दतीवर चालणारे मोड्युल/संयंत्र:

अनु. क्र.	स्थापित क्षमतेच्या टक्केवारीत मोड्युल/संयंत्राचे लोडींग	एसएचआर मधील वाढ (मोड्युल/ संयंत्रासाठी) (%)
१.	८५ -१००	निरंक
२.	८० - <८५	२.५
३.	७० - <८०	५
४.	६० - <७०	८
५.	५० - <६०	१२

दोन) ओपन-सायकल पध्दतीवर चालणारे मोड्युल/संयंत्र :

अनु.क्र.	स्थापित क्षमतेच्या टक्केवारीत मोड्युल/संचाचे लोडींग	एसएचआर मधील वाढ (मोड्युल/संचासाठी) (%)
१.	८५ -१००	निरंक
२.	८० - <८५	३
३.	७० - <८०	७
४.	६० - <७०	११
५.	५० - <६०	१६

३४.८.४ या विनियमांतर्गत भरपाईच्या प्रयोजनासाठी, वेळोवेळी सुधारणा केलेल्या मविनिआ बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०२४ च्या विनियम ४७ अंतर्गत विनिर्दिष्ट केलेल्या निकषां व्यतिरिक्तच्या सहाय्यकारी ऊर्जा वापरातील (एईसी) वाढ खालीलप्रमाणे विचारात घेण्यात येईल:

ए) कोळसा किंवा लिग्नाईटवर आधारीत निर्मिती केंद्रांसाठी:-

अनु. क्र.	स्थापित क्षमतेच्या टक्केवारीत संचाचा भार (युनिट लोडींग)	अनुज्ञेय एइसीमधील वाढ % मध्ये
१.	८५ - १००	निरंक
२.	८० - <८५	०.५
३.	७० - <८०	१.१
४.	६० - <७०	१.८
५.	५० - <६०	२.५
६.	४० - <५०	३.२

बी) वायु किंवा द्रव इंधनावर आधारीत निर्मिती केंद्रांसाठी:

अनु.क्र.	स्थापित क्षमतेच्या टक्केवारीत संचाचा भार (युनिट लोडींग)	एईसीमधील अनुज्ञेय वाढ % मध्ये
१.	८५ - १००	निरंक
२.	८० - <८५	०.२५
३.	७० - <८०	०.५०
४.	६० - <७०	०.८०
५.	५० - <६०	१.२०

३४.८.५ सीईआरसी (भारतीय विद्युत ग्रिड संहिता) विनियम, २०२३ च्या विनियम ४७ च्या संदर्भात युनिट शटडाऊन अंतर्गत निर्मिती केंद्रासाठी एक वर्षातील सात (७) प्रारंभ/बंदच्या व्यतिरिक्त दुय्यम इंधन तेल वापरासाठी अतिरिक्त भरपाई अनुज्ञेय राहील. या विनियमांतर्गत भरपाईच्या प्रयोजनासाठी, प्रत्येक प्रारंभासाठी दुय्यम इंधन तेलाचा वापर खालील निकष किंवा प्रत्यक्ष वापराच्या आधारावर, यापैकी जे कमी असेल ते, विचारात घेण्यात येईल:-

संचाचे आकारमान (मेगावॅट)	प्रत्येक प्रारंभासाठी दुय्यम इंधन तेलाचा वापर (Kl)		
	उष्ण	गरम	थंड
२००/२१०/२५० मेगावॅट	२०	४०	६०
५०० मेगावॅट	३०	६०	१००
६६० मेगावॅट	४५	७५	१३०
८०० मेगावॅट	६०	८०	१५०

५५ % युनिट लोडींगच्या खाली संचलित होणाऱ्या संचांसाठी ०.२ मिली/केब्ल्युएच अतिरिक्त विशिष्ट दुय्यम इंधन तेलाचा वापर करण्यास परवानगी देण्यात येईल आणि विशेष गुंतागुंतीच्या किंवा अल्ट्रा-विशेष गुंतागुंतीच्या संचांसाठी, सुरुवातीच्या किंवा स्थिरीकरण कालावधीतील प्रश्नांमुळे, वाणिज्यिक तत्त्वावरील कामकाजाच्या दिनांकापासून (सीओडी) ३ वर्षांच्या कालावधीकरिता ज्यादा १०% प्रारंभीच्या तेल वापरास परवानगी देण्यात येईल.

३४.८.६ भरपाई विचारात घेतल्यानंतर प्रत्यक्ष ऊर्जा आकारां व्यतिरिक्त परिगणना केलेली वित्तीय लाभाची विभागणी निर्मिती केंद्र आणि लाभधारक यांच्यामध्ये मविनिआ (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०२४ आणि त्यामधील सुधारणांतर्गत नफा आणि तोट्याच्या विभागणीच्या तरतुदींनुसार करण्यात येईल.

३४.८.७ केंद्रातील उष्मांक प्रमाण, सहाय्यकारी ऊर्जा वापर आणि दुय्यम तेल वापराचे प्रत्यक्ष भारांकित सरासरीचे संचालनात्मक मापदंड विचारात घेऊन आर्थिक वर्षाच्या अखेरीस भरपाईचा ताळमेळ घालण्यात येईल.

३४.८.८ निर्मिती केंद्राच्या संचांचे अंशत: भार संचलन आणि बऱ्याचदा केलेल्या प्रारंभ आणि बंदमुळे होणाऱ्या उष्मांक प्रमाणातील आणि सहाय्यकारी वापरातील वाढ आणि दुय्यम इंधन तेल वापर यांची भरपाई काढण्यासाठी केंद्रीय आयोगाच्या मान्यतेसह एनएलडीसीने जारी केलेली कार्यपध्दती लागू राहील.

४. मुख्य विनियमांच्या विनियम ४९.१ मध्ये सुधारणा

४९. **प्रयोज्यता**

ही काल व परिमाण निर्धारण (शेड्युलिंग) आणि प्रेषण संहिता खाली दिल्यानुसार लागू राहील -

४९.१ राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडलेले सर्व विक्रेते, मुक्त प्रवेश निर्माते, ऊसाच्या चिपाड्यावर आधारीत सह-निर्मिती संयत्र/बायोमास संयत्रे, स्व-वापराकरिता ऊर्जा निर्मिती करणारे वीजनिर्माते (इन-सिट्यु कॅप्टीव्ह निर्माते वगळून).

परंतु असे की, वितरण यंत्रणेशी संलग्न असलेले सर्व वीज निर्माते जर आंतर-राज्य व्यवहार करीत असतील किंवा त्यांच्या वितरण परवानाधारक क्षेत्राच्या बाहेर मुक्त प्रवेशाच्या माध्यमातून विजेची विक्री करीत असतील तर अशा संयंत्रांना देखील काल व परिमाण निर्धारण (शेड्युलिंग) आणि प्रेषण संहिता लागू राहील.

परंतु आणखी असे की, पवन आणि सौर निर्मितीच्या काल व परिमाण निर्धारणाचे (शेड्युलिंग) नियमन महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (सौर आणि पवन ऊर्जा निर्मितीकरिता पूर्वानुमान, काल व परिमाण निर्धारण (शेड्युलिंग) आणि तफावतीची हिशोबपूर्ती) विनियम, २०१८ आणि त्यामध्ये करण्यात आलेल्या सुधारणांमधील तरतुदींनुसार करण्यात येईल.

५. मुख्य विनियमांच्या विनियम ५०.२.१ आणि ५०.२.२ मध्ये सुधारणा:-

५०.२ **राज्य एन्टीटीजची भूमिका आणि जबाबदाऱ्या**

ए) विक्रेते :

५०.२.१ या शेड्युलिंग आणि प्रेषण संहितेमधील तरतुदी राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडलेले सर्व विक्रेते, मुक्त प्रवेश निर्माते, ऊसाच्या चिपाड्यांवर आधारित संयत्र/बायोमास संयत्रे, कॅप्टीव्ह निर्माते (इन-सिट्यु कॅप्टीव्ह निर्माते वगळून) यांना लागू राहतील.

परंतु असे की, वितरण यंत्रणेशी संलग्न असलेले सर्व वीज निर्माते जर आंतर-राज्य व्यवहार करीत असतील किंवा त्यांच्या वितरण परवानाधारक क्षेत्राच्या बाहेर मुक्त प्रवेशाच्या माध्यमातून विजेची विक्री करीत असतील तर अशा संयत्रांना देखील शेड्युलिंग आणि प्रेषण संहितेतील तरतुदी लागू राहतील.

परंतु आणखी असे की, पवन आणि सौर ऊर्जा निर्मितीच्या काल व परिमाण निर्धारणाचे (शेड्युलिंग) नियमन महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (सौर आणि पवन ऊर्जा निर्मितीकरिता पूर्वानुमान, काल व परिमाण निर्धारण (शेड्युलिंग) आणि तफावतीची हिशोबपूर्ती) विनियम, २०१८ आणि त्यामध्ये करण्यात आलेल्या सुधारणांमधील तरतुदींनुसार करण्यात येईल.

५०.२.२ या शेड्युलिंग आणि प्रेषण संहितेच्या तरतुदी राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडलेल्या सर्व नुतनशील ऊर्जा निर्मिती केंद्रांना (पवन आणि सौर ऊर्जा निर्माते वगळून) एसएलडीसीने विनिर्दिष्ट केलेल्या सविस्तर कार्यपध्दतीनुसार शेड्युलिंगच्या प्रयोजनासाठी लागू राहतील.

६. मुख्य विनियमांच्या विनियम ५२.२ मध्ये सुधारणा:-

५२.२ विक्रेत्यांसाठी डे अहेड शेड्युलिंगची तत्त्वे:

५२.२.१ या विनियमांतर्गत समाविष्ट असलेले सर्व विक्रेते (सौर/पवन ऊर्जा निर्मिती केंद्रे वगळून) एसएलडीसीला काल-गट तत्त्वावर त्यांच्या पूर्वानुमानित संच-निहाय उपलब्धतेचे अंदाज देतील. त्याशिवाय, जर विक्रेत्याने निर्मिती केंद्रामधील संचांसाठी बहुविध करार किंवा एकाच संचामध्ये बहुविध करार केलेले असतील तर, विक्रेता एसएलडीसीला प्रत्येक करारासाठी स्वतंत्रपणे डे-अहेड तत्त्वावर त्यांचे अंदाजित उपलब्धता निर्धारण देईल. सौर/पवन निर्मात्यांच्या शेड्युलिंगच्या संबंधात वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेले, मविनिआ पुर्वानुमान आणि शेड्युलिंग विनियम २०१८ आणि त्याखाली तयार करण्यात आलेली कार्यपध्दती लागू राहील.

५२.२.२ उपलब्धतेचे अनुमान सादर करताना, विक्रेता त्यांच्या 'कॅप्टीव्ह ग्राहक' आणि 'मुक्त प्रवेश ग्राहकां'ची भार आवश्यकता विचारात घेईल आणि स्वतंत्रपणे भार आवश्यकता सादर करेल जेणेकरुन करारबध्द क्षमतेपर्यंत पूर्णपणे भार प्रेषण करण्यात येईल.

त्याशिवाय, अशा निर्मात्यांना, त्यांच्या कॅप्टीव्ह किंवा मुक्त प्रवेश ग्राहकांची, जसे असेल तसे, गरज वगळून एसएसलडीसीकडून यंत्रणा आणिबाणी, पारेषणातील अडथळे आणि राज्य सीमेवरील तफावतीनुसार बॅक्ड डाऊन/पिक्ड अप करण्यात येईल. अशा प्रचालनाचे आणि हिशोबपूर्तीचे नियमन या विनियमांच्या विनियम ५३.३ मधील तरतुदींनुसार करण्यात येईल आणि वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेले, मविनिआ (तफावतीच्या हिशोबपूर्तीची कार्यपध्दती आणि संबंधित बाबी) विनियम, २०२६ मधील व्हर्च्युअल राज्य एन्टीटी (व्हिएसइ) चौकटीनुसार त्याची हिशोबपूर्ती करण्यात येईल.

५२.२.५ रद्द करण्यात येते.

५२.२.६ या विनियमांतर्गत समाविष्ट असलेले नूतनशील ऊर्जा निर्माते पाणी, बायोमास, ऊसाची चिपाडे इ. सारख्या वीजनिर्मिती स्त्रोतांच्या आधारे त्यांची उपलब्धता विचारात घेऊन १५ मिनिटांचे काल गट निहाय निर्धारण तयार करतील आणि ज्यांच्याशी त्याचे वीज खरेदी करार झाले आहेत किंवा मुक्त प्रवेशाची परवानगी आहे, जसे असेल तसे, त्या संबंधित खरेदीदारांना त्याबाबत कळवून एसएलडीसीला सादर करतील. एसएलडीसी भार-निर्मिती संतुलन तयार करताना सदर निर्धारण विचारात घेईल.

७. मुख्य विनियमांतील विनियम ५२.५ मध्ये बदल: मुख्य विनियमांतील विनियम ५२.५ खालीलप्रमाणे बदलण्यात येतात.

५२.५ **डे अहेड शेड्युलिंगसाठी शेड्युलिंग आणि प्रेषण कार्यपध्दती आणि काल मर्यादा**

ए) आंतर राज्य निर्मिती केंद्रे (आयएसजीएस) डब्ल्युआरएलडीसीच्या कार्यपध्दतीनुसार, दररोज सकाळी ०६०० वाजेपर्यंत, डब्ल्युआरएलडीसीला पुढील दिवसासाठी, म्हणजेच १५ मिनिटांच्या काल गटाने पुढील दिवसाच्या ०००० तासांपासून २४०० तासांपर्यंत, एमडब्ल्यु आणि एमडब्ल्युएच मधील केंद्र-निहाय एक्स पॉवर प्लान्ट उपलब्धतेबाबत, सूचना देतील.

बी) प्रत्येक विक्रेता, दररोज सकाळी ०६०० वाजेपर्यंत, एसएलडीसीला पुढील दिवसासाठीचे, म्हणजेच १५ मिनिटांच्या काल गटाने पुढील दिवसाच्या ०००० तासांपासून २४०० तासांपर्यंत, त्यांच्या निर्मिती संचाचे कोणतेही आऊटेज (संच देखभाल व दुरुस्तीसाठी बंद करणे) विचारात घेऊन, एमडब्ल्यु आणि एमडब्ल्युएच मधील संच-निहाय निर्मितीच्या उपलब्धतेबाबत जोडपत्र - १० च्या **नमुना - १ एस** मध्ये माहिती देईल.

सी) संच/केंद्रामध्ये एकापेक्षा अधिक वीज खरेदी करार (पीपीए) असलेला प्रत्येक विक्रेता, दररोज सकाळी ०६०० वाजेपर्यंत, एसएलडीसीला पुढील दिवसासाठीचे, म्हणजेच १५ मिनिटांच्या काल गटाने पुढील दिवसाच्या ०००० तासांपासून २४०० तासांपर्यंत, त्यांच्या निर्मिती संचाचे कोणतेही आऊटेज (संच देखभाल व दुरुस्तीसाठी बंद करणे) विचारात घेऊन, निर्धारणासाठी जारी करावयाचे एमडब्ल्यु आणि एमडब्ल्युएच मधील पीपीए-निहाय किमान निर्धारण आणि पीपीए-निहाय रॅम्प रेट यासारख्या तांत्रिक माहितीच्या इनपुट्स सह पीपीए निहाय डीसी **नमुना - १ एस** मध्ये सादर करेल.

डी) डब्ल्युआरएलडीसी राज्यातील लाभधारकांसाठी, डब्ल्युआरएलडीसीच्या कार्यपध्दतीनुसार, दररोज सकाळी ०७०० वाजेपर्यंत, एसएलडीसीला पुढील दिवसासाठी, म्हणजेच १५ मिनिटांच्या काल गटाने पुढील दिवसाच्या ०००० तासांपासून २४०० तासांपर्यंत, एमडब्ल्यु आणि एमडब्ल्युएच मधील केंद्र-निहाय एक्स पॉवर प्लान्ट उपलब्धतेबाबत, सूचना (डब्ल्युआरएलडीसीच्या संकेत-स्थळावर उपलब्ध) देईल.

इ) राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडलेले पुलिंग उप-केंद्र निहाय क्युसीए, दररोज सकाळी ०७०० वाजेपर्यंत, एसएलडीसीला पुढील दिवसासाठीचे, म्हणजेच १५ मिनिटांच्या काल गटाने पुढील दिवसाच्या ०००० तासांपासून २४०० तासांपर्यंत, त्यांच्या निर्मिती संचाचे कोणतेही आउटेज (संच देखभाल व दुरुस्तीसाठी बंद करणे) विचारात घेऊन एमडब्ल्यु आणि एमडब्ल्युएच मधील निर्मितीच्या उपलब्धतेबाबत मविनिआ पुर्वानुमान आणि शेड्युलिंग विनियमांमधील पुर्वानुमान आणि शेड्युलिंग कार्यपध्दतीनुसार, माहिती देतील.

एफ) सर्व राज्यांतर्गत एन्टीटीज्, दररोज ०७१५ वाजेपर्यंत, डब्ल्युआरएलडीसी डब्ल्युबीइएस पोर्टलवर डी-१ दिवशी आंतर-राज्य एन्टीटीज्सोबत झालेल्या करारानुसार त्यांच्याशी समन्वय साधून मागणी सादर/सुनिश्चित करतील.

जी) प्रत्येक खरेदीदार, दररोज सकाळी ०७१५ वाजेपर्यंत, पुढील दिवसासाठी, म्हणजेच १५ मिनिटांच्या काल गटाने पुढील दिवसाच्या ०००० तासांपासून २४०० तासांकरिता, त्यांनी अल्प-कालिन आणि दीर्घ-कालिन तत्त्वावर अनुक्रमे करारबध्द केलेल्या द्विपक्षीय वीज आणि आयपीपी मागणीसाठी, १५ मिनिटांच्या काल गट तत्त्वावर पुढील दिवसाच्या अपेक्षित वीज खेचणीचे निर्धारण देईल. खरेदीदार त्यांच्या वितरण जाळ्याशी जोडलेल्या सर्व एम्बेडेड निर्मात्यांची अपेक्षित वीजनिर्मिती विचारात घेऊन अशा सर्व निर्मिती केंद्रांसाठी पुढील दिवसासाठी त्यांच्या वीज खेचणीचे निर्धारण एसएलडीसीला जोडपत्र - १० च्या **नमुना - १ बी** मध्ये देईल.

एच) सर्व पूर्णतः पारेषण मुक्त प्रवेश ग्राहक, दररोज सकाळी ०७१५ तासांपर्यंत, पुढील दिवसासाठी, म्हणजेच १५ मिनिटांच्या काल गटाने पुढील दिवसाच्या ०००० तासांपासून २४०० तासांपर्यंत, त्यांच्या वीज खेचणीचे निर्धारण जोडपत्र - १० च्या **नमुना-१ बी** मध्ये एसएलडीसीला देतील.

आय) दररोज सकाळी ०७१५-०७३० वाजेपर्यंत, एसएलडीसी केंद्रीय वाटणी आणि एससीयुसी विचारात घेऊन वाटप केलेले राखीव निर्धारण विचारात घेऊन प्रायोगिक पुढील काळाचा अंदाज घेणारी एससीइडी राबविल.

जे) दररोज ०८०० वाजेपर्यंत, एसएलडीसी किंवा जीएनए मंजुरी प्राप्तकर्ता जसे असेल तसे, आयईजीसी, २०२३ च्या तरतुदींनुसार घोषित केलेल्या हक्काच्या आधारावर, डब्ल्युआरएलडीसीकडे पुढील दिवसासाठी वीज खेचणीकरिता, त्यांच्या करारांनुसार, काल गट-निहाय मागणी सादर करेल.

परंतु असे की, काल गट-निहाय मागणी सादर करताना वीज खेचणी करणारा जीएनए मंजुरी प्राप्तकर्ते, तांत्रिक अडचणींच्या अधीन राहून, ज्या निर्मिती केंद्रांशी ते करारबध्द झाले आहेत त्याची मेरीट ऑर्डर विचारात घेतील.

परंतु असे की, नुतनशील ऊर्जा केंद्रे मेरीट ऑर्डर डिस्पॅचच्या अधीन नसतील, आणि तांत्रिक अडचणींच्या अधीन राहून नुतनशील ऊर्जा केंद्रांकडून प्रथम मागणी करण्यात

येईल आणि त्यानंतर मेरीट ऑर्डरप्रमाणे अन्य निर्मिती केंद्राकडून मागणी करण्यात येईल.

के) डब्ल्युआरएलडीसी, ०८१५ वाजेपर्यंत, वीज खेचणी करणाऱ्या जीएनए मंजुरी प्राप्तकर्त्याने केलेल्या मागणी प्रमाणे वीज खेचणीचे निर्धारण करता येऊ शकते का याची तपासणी उपलब्ध पारेषण क्षमतेच्या आधारावर करेल.

परंतु असे की, पारेषण यंत्रणेमध्ये अडथळे असल्यास, पारेषण अडथळा प्रदेशात किंवा प्रदेशाबाहेर आहे किंवा कसे यावर अवलंबून, जसे असेल तसे, उपलब्ध पारेषण कॉरिडॉरचे वाटप वीज खेचणी करणाऱ्या जीएनए मंजुरी प्राप्तकर्त्यांमध्ये त्यांच्या जीएनएच्या प्रमाणात प्रदेशामध्ये किंवा प्रदेशाबाहेरुन करण्यात येईल. याबाबत वीज खेचणी करणाऱ्या जीएनए मंजुरी प्राप्तकर्त्याला डी-१ दिवशी सकाळी ८.१५ पर्यंत कळविण्यात येईल.

एल) सकाळी ०८३० वाजेपर्यंत, वीज खेचणी करणारे जीएनए मंजुरी प्राप्तकर्ते अशा मंजुरी प्राप्तकर्त्यांसाठी असलेल्या पारेषण कॉरिडॉरच्या उपलब्धतेच्या आधारावर त्यांच्या निर्धारीत वीज खेचणीच्या मागणीमध्ये सुधारणा करतील.

एम) डब्ल्युआरएलडीसी, ०९०० वाजेपर्यंत विजेची खेचणी आणि अंतक्षेपण करणाऱ्या जीएनए मंजुरी प्राप्तकर्त्यांसाठी वीज खेचणीचे आणि अंत:क्षेपणाचे अंतिम निर्धारण जारी करेल.

परंतु असे की, जीएनए विनियमांमध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार 'अन्य जीएनए मंजुरी प्राप्तकर्त्याने जीएनएचा वापर' करण्याच्या प्रयोजनासाठी, अन्य एन्टीटीसोबत वाटणी केलेला जीएनए, नवीन एन्टीटीचा जीएनए म्हणून विचारात घेण्यात येईल.

एन) आरएलडीसी, सकाळी ०९४५ वाजेपर्यंत, टीजीएनए मंजुरी प्राप्तकर्त्यांची डी-१ दिवशीची मागणी विचारात घेऊन वीज खेचणीचे अंतिम निर्धारण जारी करेल.

ओ) एसएलडीसी, १००० वाजेपर्यंत, आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या विकेंद्रीत (खरेदीदार निहाय) एमओडी तत्त्वानुसार, पुढील दिवसासाठी, म्हणजेच १५ मिनिटांच्या काल गटाने पुढील दिवसाच्या ०००० तासांपासून २४०० तासांपर्यंत भार निर्मिती संतुलन तयार करेल.

परंतु असे की, एसएलडीसी मागणी न करण्यात आलेल्या शिल्लक (युआरएस) विजेची उपलब्धता किंवा विजेच्या तुटीसंबंधातील, असल्यास, माहिती एसएलडीसीच्या संकेत-स्थळावर प्रसिध्द करेल.

पी) एसएलडीसी, सकाळी १००० वाजेपर्यंत, राज्यांतर्गत अडथळे विचारात घेऊन, पुढील दिवसासाठी, म्हणजेच १५ मिनिटांच्या काल-गटाने पुढील दिवसांच्या ०००० तासांपासून २४०० तासांपर्यंत विक्रेते, क्युसीए, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडलेले विक्रेते, क्युसीए, सर्व नुतनशील ऊर्जा निर्मात्यांकरिता लक्ष्यांकित प्रेषण निर्धारण आणि

खरेदीदारांसाठी वीज खेचणीचे निर्धारण त्यांच्या संकेत-स्थळावर जोडपत्र १० अंतर्गत **नमुना २ बी** मध्ये आणि विक्रेत्यांसाठी **नमुना २ एस** मध्ये प्रसिध्द करेल.

क्यु) १००० ते ११०० वाजेपर्यंत, सीइआरसीच्या विनियमांतील संबंधित तरतुदी आणि कार्यपध्दतीनुसार पॉवर एक्स्चेंजमध्ये डे-अहेड मार्केटसाठी बोलीसाठीची खिडकी आणि टिआरएएस खुली होईल.

आर) १३०० वाजेपर्यंत, पॉवर एक्स्चेंज आयइजीसी २०२३ च्या शेड्युलिंग कार्यपध्दतीच्या संबंधित तरतुदींनसार सामुहिक व्यवहारांच्या डी-१ दिवसाच्या १३०० वाजेपर्यंत प्रादेशिक एन्टीटीजसाठी एनएलडीसीकडे आणि राज्यांतर्गत एन्टीटीजसाठी एसएलडीसीकडे अंतिम व्यवहार निर्धारण सादर करेल.

एस) १४०० वाजेपर्यंत, डब्ल्युआरएलडीसी डी-१ दिवसाच्या १३०० तासांपर्यंत प्राप्त झालेल्या तातडीच्या अर्जांवर प्रक्रिया करेल आणि तातडीच्या अर्जांसाठीचे निर्धारण अंतिम केल्यानंतर शिल्लक पारेषण कॉरिडॉरची उपलब्धता, असल्यास, त्यांच्या संकेत-स्थळावर अद्ययावत करेल. आयइजीसी २०२३ च्या शेड्यलिंग कार्यपध्दतीच्या संबंधित तरतुदींनुसार, शिल्लक पारेषण कॉरिडॉर जीएनए मंजुरी प्राप्तकर्त्यांद्वारा त्यांच्या जीएनएतील कोणत्याही करारांतर्गत निर्धारणातील सुधारणांद्वारे किंवा तातडीच्या अर्जांसाठी किंवा प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्त्वावर रियल टाईम मार्केटमध्ये वापरण्यात येईल.

टी) १४३० वाजेपर्यंत, जीएनए मंजुरी प्राप्तकर्ता किंवा एसएलडीसी, आयइजीसी २०२३ च्या शेड्यलिंग कार्यपध्दतीच्या संबंधित तरतुदींनुसार पुढील दिवसासाठी, म्हणजेच १५ मिनिटांच्या काल गटाने पुढील दिवसाच्या ०००० तासांपासून २४०० तासांपर्यंत, एमडब्ल्यु आणि एमडब्ल्युएचमध्ये वाढीव आयएसजीएस मागणी सादर करु शकेल.

यु) १६०० वाजेपर्यंत, एसएलडीसी सुधारीत खरेदीदार निहाय एमओडी विचारात घेऊन पुढील दिवसासाठी, म्हणजेच पुढील दिवसाच्या ०००० तासांपासून २४०० तासांपर्यंत, सुधारीत भार निर्मिती संतुलन तयार करेल आणि एसएलडीसीच्या संकेत-स्थळावर ते प्रसिध्द करेल.

व्ही) दररोज २००० वाजेपर्यंत, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडलेला प्रत्येक विक्रेता, पुढील दिवसासाठी, म्हणजेच १५ मिनिटांच्या काल गटाने पुढील दिवसाच्या ०००० तासांपासून २४०० तासांपर्यंत, त्यांच्या निर्मिती संचाचे कोणतेही आउटेज (संच देखभाल व दुरुस्तीसाठी बंद करणे) विचारात घेऊन त्याच्या संच-निहाय निर्मितीची एमडब्ल्यु आणि एमडब्ल्युएच मधील सुधारित उपलब्धता जोडपत्र - १० च्या **नमुना १ एस** मध्ये एसएलडीसीला सादर करेल.

डब्ल्यु) दररोज २००० वाजेपर्यंत, वितरण कंपन्या/खरेदीदार, पुढील दिवसासाठी, म्हणजेच १५ मिनिटांच्या काल गटाने पुढील दिवसाच्या ०००० तासांपासून २४०० तासांपर्यंत,

त्यांच्या निर्मिती संचाचे कोणतेही आऊटेज (संच देखभाल व दुरुस्तीसाठी बंद करणे) विचारात घेऊन, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडलेल्या नूतनशील ऊर्जा निर्मात्यांचे एकत्रित सुधारीत निर्धारण एसएलडीसीला जोडपत्र - १० च्या **नमुना - १ एस** मध्ये सादर करेल.

एक्स) प्रत्येक खरेदीदार, दररोज २२०० तासांपर्यंत, त्यांच्या वितरण जाळ्याशी जोडलेल्या सर्व अंतर्निहित (एम्बेडेड) निर्मात्यांची अपेक्षित निर्मिती विचारात घेऊन, त्यांच्या अल्प-कालिन मुक्त प्रवेश, दीर्घ-कालिन मुक्त प्रवेश, सामुदायिक व्यवहारासंबंधात १५ मिनिटांच्या काल गट तत्त्वावर पुढील दिवसासाठीच्या वीज खेचणीचे त्यांचे सुधारित निर्धारण जोडपत्र - १० अंतर्गत अनुक्रमे **नमुना २ बी** मध्ये देतील.

वाय) एसएलडीसी २२०० वाजेपर्यंत, पुढील दिवसासाठी, म्हणजेच १५ मिनिटांच्या काल गटाने पुढील दिवसाच्या ०००० तासांपासून २४०० तासांपर्यंत, खरेदीदारांकडून एमडब्ल्यु आणि एमडब्ल्युएच मध्ये आंतर राज्य निर्मिती केंद्राच्या सुधारित वीज खेचणीचे निर्धारण प्राप्त करेल.

झेड) एसएलडीसी, २२३० वाजेपर्यंत, खरेदीदार-निहाय एमओडी तत्व विचारात घेऊन, पुढील दिवसासाठी, म्हणजेच पुढील दिवसाच्या ०००० तासांपासून २४०० तासांपर्यंत, अंतिम काल गट निहाय भार निर्मिती संतुलन तयार करेल आणि एसएलडीसीच्या संकेत-स्थळावर ते प्रसिध्द करेल.

एए) एसएलडीसी, २२३० वाजेपर्यंत, पुढील दिवसासाठी म्हणजेच ०००० तासांपासून २४०० तासांपर्यंत, १५ मिनिटांच्या काल गटावर राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडलेले सर्व विक्रेते, क्युसीए, पवन आणि सौर निर्मात्यांव्यतिरिक्त नूतनशील उर्जा निर्मात्यांना अंतिम प्रेषणाचे निर्धारण आणि खरेदीदारांना वीज खेचणीचे निर्धारण देईल.

८. मुख्य विनियमांच्या विनियम ५३ मध्ये सुधारणा:-

मुख्य विनियमांच्या विनियम ५३.२ मध्ये बदल: मुख्य विनियमांच्या विनियम ५३.२[१] च्या खंड ५३.२.१, ५३.२.२ आणि ५३.२.३ खालीलप्रमाणे बदलण्यात येतात:-

५३.२.१ दीर्घ कालिन आणि मध्यम कालिन करारासाठी क्षमता आकार आणि ऊर्जा आकारांवर आधारीत दोन भागांचा वीज दर असलेल्या आंतर राज्य निर्मिती केंद्राच्या (आयएसजीएस) संचाच्या सक्तीच्या आउटेजच्या बाबतीत, डब्ल्युआरएलडीसी आंतर राज्य निर्मिती केंद्राने घोषित केलेल्या सुधारीत क्षमतेच्या आधारे निर्धारणामध्ये सुधारणा करेल. आरएलडीसीकडे ज्या काल गटात सुधारणा करण्याची विनंती करण्यात आलेली आहे तो काल गट पहिला काल गट म्हणून मोजण्यात येऊन, घोषित क्षमता किंवा निर्धारणामध्ये विषम काल-गटात

[१] ७व्या आणि ८व्या काल-गटात अंमलात येणाऱ्या निर्धारित सुधारणांशी संबंधित सुधारीत तरतुदी आयोगाने स्वतंत्रपणे अधिसूचित करावयाच्या दिनांकापासून अंमलात येतील. तोपर्यंत मुख्य विनियमांच्या तरतुदी लागू राहतील.

सुधारणा करण्याची विनंती ७ व्या काल-गटापासून अंमलात येईल आणि सम काल-गटामध्ये सुधारणा करण्याची कोणतीही विनंती ८ व्या काल-गटापासून अंमलात येईल.

५३.२.२ केंद्रीय पारेषण कंपनीच्या किंवा मालकीची पारेषण यंत्रणा, संलग्न स्विचयार्ड आणि उप-केंद्रांमध्ये कोणताही अडथळा, बंद आउटेज, बिघाड झाल्यामुळे किंवा मर्यादा आल्यामुळे किंवा आंतर-राज्य पारेषणात (डब्ल्युआरएलडीसीने प्रमाणित केल्यानुसार) सहभागी असलेल्या अन्य कोणत्याही पारेषण परवानाधारकाच्या वीजनिर्मितीमध्ये घट करणे आवश्यक झाल्यामुळे, विजेच्या निष्कासनामध्ये कोंडी (बॉटलनेक) निर्माण झाल्यास डब्ल्युआरएलडीसी निर्धारणामध्ये सुधारणा करेल. ज्या काल गटात निर्धारणामध्ये सुधारणा करण्यात आली तो काल गट पहिला काल गट मानून त्याच्या ७ व्या काल गटापासून किंवा ८ व्या काल गटापासून डब्ल्युआरएलडीसीने सुधारित केलेल्या वीज निर्मिती आणि खेचणीचे निर्धारण अंमलात येईल. तसेच, सर्व बाधित आंतर राज्य निर्मिती केंद्राची निर्धारित निर्मिती आणि लाभधारकांची निर्धारित वीज खेचणी त्यानुसार सुधारीत करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

५३.२.३ डब्ल्युआरएलडीसीला ज्या काल गटात सुधारणा करण्याची विनंती प्राप्त झाली तो काल गट पहिला काल गट मानून ७ व्या काल गटाच्या किंवा ८ वा काल गटाच्या आगाऊ सूचनेसह डब्ल्युआरएलडीसी दिवस/काल गटाच्या उर्वरित कालावधीसाठी आंतर राज्य निर्मिती केंद्राने घोषित केलेल्या क्षमतेमध्ये आणि राज्याच्या वीज खेचणीच्या निर्धारणामध्ये सुधारणा करण्यास परवानगी देईल.

९. मुख्य विनियमांच्या विनियम ५३.३[२] मध्ये बदल:- मुख्य विनियमांच्या विनियम ५३.३ चे खंड ५३.३.५, ५३.३.८ आणि ५३.३.९ खालीलप्रमाणे बदलण्यात येतात:-

५३.३.५ त्यानुसार, एसएलडीसी, जनरेटरर्सच्या वीजनिर्मितीच्या वेगाच्या प्रमाणासारखे (रॅम्प रेट) तांत्रिक अडथळे विचारात घेऊन, जेणेकरुन भार-निर्मिती संतुलन राखले जावे आणि या विनियमांमध्ये आणि आयईजीसीमध्ये ठरवून दिलेल्या अटींची पूर्तता व्हावी याकरिता, संपूर्ण राज्यासाठी केंद्रीकृत एमओडी तत्त्वानुसार आवश्यक प्रेषण किंवा कपातीच्या सूचना निर्गमित करेल. अशा प्रकरणी, एसएलडीसीने सुधारीत निर्धारण जारी केले तो काल गट पहिला काल गट म्हणून मोजण्यात येऊन, विषम काल गटात केलेले सुधारीत निर्धारण ७ व्या काल गटापासून अंमलात येईल किंवा सम काल गटांमध्ये निर्धारणामध्ये केलेली कोणतीही सुधारणा ८ व्या काल गटापासून अंमलात येईल. तसेच, निर्धारणामध्ये सुधारणा करण्यात येईपर्यंत अशा घटनेच्या सर्व काल गटांचे निर्धारण प्रत्यक्ष निर्मिती इतके सुधारीत करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

५३.३.८ वेळोवेळी सुधारणा केलेल्या या विनियमांमध्ये आयोगाने विनिर्दिष्ट केलेली एमओडी तत्त्वे आणि आयोगाने निर्गमित केलेल्या आदेशांनुसार औष्णिक विद्युत केंद्र बॅकींग डाऊन करण्यात येईल.

---

[२] ७व्या आणि ८व्या काल-गटात अंमलात येणाऱ्या निर्धारित सुधारणांशी संबंधित सुधारीत तरतुदी आयोगाने स्वतंत्रपणे अधिसूचित करावयाच्या दिनांकापासून अंमलात येतील. तोपर्यंत मुख्य विनियमांच्या तरतुदी लागू राहतील.

५३.३.९ राज्य पारेषण कंपनीच्या किंवा मालकीची पारेषण यंत्रणा, संलग्न स्विचयार्ड आणि उप-केंद्रांमध्ये कोणताही अडथळा, बंद आउटेज, बिघाड झाल्यामुळे किंवा मर्यादा आल्यामुळे किंवा राज्यांतर्गत पारेषणात (एसएलडीसीने प्रमाणित केल्यानुसार) सहभागी असलेल्या अन्य कोणत्याही पारेषण परवानाधारकाच्या वीजनिर्मितीमध्ये घट करणे आवश्यक झाल्यामुळे, विजेच्या निष्कासनामध्ये कोंडी (बॉटलनेक) निर्माण झाल्यास एसएलडीसी निर्धारणामध्ये सुधारणा करेल, जी ७ व्या काल गटापासून किंवा ८ व्या काल गटापासून अंमलात येईल, ज्या काल गटात निर्धारणामध्ये सुधारणा करण्यात आली तो काल गट पहिला काल गट म्हणून मोजण्यात येईल. तसेच, सर्व बाधित राज्यांतर्गत निर्मात्यांची निर्धारित निर्मिती प्रत्यक्ष निर्मिती इतकी सुधारीत करण्यात आल्याचे मानण्यात येईल आणि लाभधारकांची निर्धारित वीज खेचणी त्यानुसार सुधारीत करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

१०. मुख्य विनियमांच्या विनियम ५३.४[३] मध्ये बदल:-

मुख्य विनियमांच्या विनियम ५३.२ मध्ये बदल:- मुख्य विनियमांच्या विनियम ५३.४ चे खंड ५३.४.२, ५३.४.३, ५३.४.५ आणि ५३.४.६ खालीलप्रमाणे बदलण्यात येतात:-

५३.४ **विक्रेत्याद्वारे निर्धारणामध्ये सुधारणा**

५३.४.२ दीर्घ-कालिन आणि मध्यम-कालिन करारासाठी क्षमता आकार आणि ऊर्जा आकारांवर आधारीत दोन भागांचा वीज दर असलेल्या राज्यांतर्गत निर्मात्यांच्या केंद्रांच्या संचाच्या सक्तीच्या बंदच्या बाबतीत, एसएलडीसी राज्यांतर्गत निर्मात्यांनी घोषित केलेल्या सुधारीत क्षमतेच्या आधारे निर्धारणात सुधारणा करील. सुधारीत घोषित क्षमता आणि सुधारीत निर्धारण ७ व्या किंवा ८ व्या काल गटापासून अंमलात येईल, ज्या काल गटात आंतर राज्य निर्मिती केंद्राने सुधारणा करण्याचे सूचित केले तो काल गट पहिला काल गट म्हणून मोजण्यात येईल. त्यानुसार या निर्मिती संचाच्या विजेच्या लाभधारकांच्या संबंधित निर्धारणामध्ये सुधारणा करण्यात येईल. एसएलडीसी विक्रेता आणि खरेदीदारांना सुधारीत निर्धारणाबाबत कळविल. मूळ निर्धारण संचाचे काम पूर्वस्थितीत येण्याच्या अंदाजित वेळेपासून अंमलात येईल.

५३.४.३ अल्प-कालिन द्विपक्षीय व्यवहारांतर्गत (पॉवर एक्स्चेंजमधील सामुदायिक व्यवहार वगळून) विजेची विक्री करणाऱ्या राज्यांतर्गत निर्मात्यांच्या संचाच्या सक्तीच्या बंद (आऊटेज)च्या बाबतीत, निर्मिती केंद्राच्या संचामधून विजेची विक्री करणारा निर्माता किंवा विजेचा व्यापारी किंवा अन्य कोणतीही एजन्सी ताबडतोब त्याबाबत निर्धारणामध्ये सुधारणा करण्याच्या मागणीसह आणि संच पूर्वस्थितीत येण्याच्या अंदाजित कालावधीसह, जसे असेल तसे, एसएलडीसीला कळविल. एसएलडीसी राज्यांतर्गत निर्मात्यांच्या सुधारीत घोषित क्षमतेच्या आधारावर निर्धारणामध्ये सुधारणा करेल. सुधारीत घोषित क्षमता आणि सुधारीत निर्धारण ७ व्या किंवा ८ व्या काल गटापासून अंमलात येईल, ज्या काल गटात राज्यांतर्गत निर्मात्याने

[३] ७व्या आणि ८व्या काल-गटात अंमलात येणाऱ्या निर्धारित सुधारणांशी संबंधित सुधारीत तरतुदी आयोगाने स्वतंत्रपणे अधिसूचित करावयाच्या दिनांकापासून अंमलात येतील. तोपर्यंत मुख्य विनियमांच्या तरतुदी लागू राहतील.

सुधारणा करण्याचे सूचित केले तो काल गट पहिला काल गट म्हणून मोजण्यात येईल. त्यानुसार या निर्मिती संचाच्या विजेच्या लाभधारकांच्या संबंधित निर्धारणामध्ये सुधारणा करण्यात येईल. एसएलडीसी विक्रेता आणि खरेदीदारांना सुधारीत निर्धारणाबाबत कळविल. मूळ निर्धारण संचाचे काम पूर्वस्थितीत येण्याच्या अंदाजित कालावधीपासून अंमलात येईल.

५३.४.४ बदल नाही

५३.४.५ राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेद्वारा जोडलेल्या सौर किंवा पवन ऊर्जा निर्मिती केंदांच्या बाबतीत, क्युसीए एसएलडीसीला आगाऊ सूचना देऊन पुलिंग उप-केंद्रांच्या (सामुहिक आणि आंतर-राज्य द्विपक्षीय व्यवहार वगळून) निर्धारणात सुधारणा करु शकेल. पवन आणि सौर ऊर्जा निर्मितीमध्ये सुधारणा करण्यासाठी वेळोवेळी सुधारणा केलेल्या मविनिआ (सौर आणि पवन ऊर्जा निर्मितीकरिता पूर्वानुमान, काल व परिमाण निर्धारण (शेड्युलिंग) आणि तफावतीची हिशोबपूर्ती) विनियम, २०१८ आणि त्याखाली तयार करण्यात आलेली कार्यपध्दती लागू राहील. अशी सुधारणा ४ थ्या काल गटापासून अंमलात येईल, ज्या काल गटात एसएलडीसीकडून सुधारणा करण्यासाठी विनंती प्राप्त झाली तो काल गट पहिला (०१) काल गट म्हणून मोजण्यात येईल.

परंतु असे की, एका दिवसात कमाल सोळा (१६) सुधारणांच्या अधीन राहून, विवक्षित दिवसाच्या ०००० तासांपासून सुरु होणाऱ्या दिड तासांच्या प्रत्येक निश्चित वेळेसाठी एकदा सुधारणा करता येईल.

५३.४.६ एसएलडीसी ७ व्या किंवा ८ व्या काल गटाच्या आगाऊ सूचनेसह दिवस/गटाच्या उर्वरीत कालावधीसाठी विक्रेत्यांना निर्मिती शेड्युलमध्ये सुधारणा करण्यास परवागी देईल. अशा प्रकरणी निर्मितीचे सुधारीत निर्धारण ७ व्या किंवा ८ व्या काल गटापासून अंमलात येईल, ज्या काल गटात एसएलडीसीला सुधारणा करण्यासाठी विनंती प्राप्त झाली तो काल गट पहिला काल गट म्हणून मोजण्यात येईल.

११. मुख्य विनियमांच्या विनियम ५३.५[४] मध्ये बदल:-

मुख्य विनियमांच्या विनियम ५३.५ च्या खंड ५३.५.१ आणि ५३.५.२ खालीलप्रमाणे बदलण्यात येतात:-

५३.५.१ एसएलडीसी ७ व्या किंवा ८ व्या काल गटाच्या आगाऊ सूचनेसह दिवस/ब्लॉकच्या उर्वरित कालावधीसाठी खरेदीदारांच्या वीज खेचणीच्या निर्धारणातील सुधारणेस परवानगी देईल. अशा प्रकरणी वीज खेचणीचे सुधारीत निर्धारण ७ व्या किंवा ८ व्या काल गटापासून अंमलात

[४] ७व्या आणि ८व्या काल-गटात अंमलात येणाऱ्या निर्धारित सुधारणांशी संबंधित सुधारीत तरतुदी आयोगाने स्वतंत्रपणे अधिसूचित करावयाच्या दिनांकापासून अंमलात येतील. तोपर्यंत मुख्य विनियमांच्या तरतुदी लागू राहतील.

येईल, ज्या काल गटात एसएलडीसीला सुधारणा करण्यासाठी विनंती प्राप्त झाली तो काल गट पहिला काल गट म्हणून मोजण्यात येईल.

५३.५.२ द्विपक्षीय व्यवहारांच्या बाबतीत, निर्धारणामधील सुधारणेस अन्य भागिदाराकडून दोन काल गटाच्या कालावधीमध्ये मान्यता मिळणे आवश्यक राहील. अशा प्रकरणी सुधारीत निर्धारण ७ व्या किंवा ८ व्या काल गटापासून अंमलात येईल, ज्या काल गटात एसएलडीसीला सुधारणा करण्यासाठी विनंती प्राप्त झाली तो काल गट पहिला काल गट म्हणून मोजण्यात येईल.

१२. जोडपत्र - ४ च्या खंड २ मध्ये सुधारणा: महाराष्ट्र राज्यातील राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेला जोडलेल्या राज्यांतर्गत निर्मात्यांच्या संचांच्या अंशत: भार संचलनामुळे आणि बऱ्याच वेळा झालेल्या चालू/बंदमुळे उष्मांक प्रमाण, सहाय्यकारी वापर आणि दुय्यम इंधन तेलाच्या वापरात वाढ झालेल्या भरपाईसाठीची कार्यपध्दती

(संदर्भ विनियम क्र. ३४.३ (एफ) आणि ३४.६)

२. प्रयोज्यता

राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडलेल्या कोळसा/वायुवर आधारित निर्मिती केंद्रांना भरपाईची कार्यपध्दती लागू राहील:

ए) आयोगाकडून ज्यांचा वीज दर स्वीकृत करण्यात येतो.

बी) निर्मिती केंद्रांच्या बाबतीत, ज्यांचा वीज दर आयोगाकडून स्वीकृत करण्यात येत नाही परंतु ती राज्य एन्टीटी आहे (स्व-वापराच्या वीज निर्मिती व्यतिरिक्त), त्यांनी अल्प-कालिन मुक्त प्रवेशाद्वारे राज्यांतर्गत खरेदीदाराला विजेची विक्री करताना, प्रस्तावित कॉम्पनसेशन कार्यपध्दती ध्यानात घेऊन, त्यांच्या वीज खरेदी करारामध्ये किंवा अन्य कोणत्याही पूरक करारामध्ये उचित तरतुदी करणे आवश्यक राहील.

ठिकाण : मुंबई
दिनांक : २१ सप्टेंबर, २०२६

(डॉ. प्रफुल्ल श्री. वऱ्हाडे)
सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

MAHARASHTRA ELECTRICITY REGULATORY COMMISSION

MAHARASHTRA ELECTRICITY REGULATORY COMMISSION

(STATE GRID CODE) (FIRST AMENDMENT) REGULATIONS, 2026

NOTIFICATION

ELECTRICITY ACT, 2003.

No. MERC/Tech/Regulation/2026/ 0783 - In exercise of the powers conferred by clause (zp) of sub-section (2) of Section 181 read along with Section 86 (1) (h) of the Electricity Act, 2003 (36 of 2003), the Maharashtra Electricity Regulatory Commission (MERC) hereby makes the following Regulations to amend the Maharashtra Electricity Regulatory Commission (State Grid Code) Regulations, 2020 ('**the Principal Regulations**'), namely:

1. Short title, applicabilty and commencement: —

1.1. These Regulations may be called the Maharashtra Electricity Regulatory Commission (State Grid Code) (First Amendment) Regulations, 2026.

1.2. These Regulations shall extend to the whole of the State of Maharashtra.

1.3. These Regulations shall come into force from the date of their publication in the Official Gazette and remain in force unless amended, varied, altered, or modified by the Commission.

